# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

### परीक्षा विभाग

सकाळ

५

## शेतीपूरक व्यवसायांना प्राधान्य द्या : उमाप

राजगुरुनगर, ता. २१ : "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उपजीविकेचे साधन म्हणून नोकरी-व्यवसायाचा विचार करताना कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन, असा शेतीपूरक व्यवसायांनाही प्राधान्य द्यावे," असा सल्ला महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप यांनी दिला.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी विधिमंडळातील निवृत्त सचिव बी. एस. भोर, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, परीक्षक प्रा. डी. जी. गायकवाड उपस्थित होते. या वेळी कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए व बीसीएस शाखांमधील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी पदवीग्रहण केली.



राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या समारंभात विद्यार्थिनीस पदवी प्रदान करताना कांतिलाल उमाप. (शेजारी) देवेंद्र बुट्टे पाटील.

उमाप म्हणाले, "कृषीसंस्कृतीत वाढल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपजत शहाणपण असते. अवर्षण, दुष्काळ, गरिबी इत्यादी आपत्तींना तोंड देताना हे मूल मोठे होत असल्याने हे शहाणपण येते. या शहाणपणाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी कठोर मेहनतीला सकारात्मक दृष्टिकोनाची जोड दिली, तर ते नक्कीच त्यांच्या आयुष्यात यशस्वी होऊ शकतील. प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याची त्यांची तयारी आधीच झालेली असते. म्हणून मग व्यवसाय, नोकरी, उद्योग असे कोणतेही करीअर असो ते पादाक्रांत करतील."

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, "विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व परिश्रम या त्रिसूत्रीचा अंगीकार केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे कार्यक्षेत्र कोणतेही निवडले तरी त्याची उंची गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे."

या कार्यक्रमाअगोदर विद्यालयाच्या 'फीडबॅक ॲप'चे ऑनलाइन उद्घाटन उमाप यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. परीक्षा विभागप्रमुख प्रा. व्ही. डी. कुलकर्णी यांनी आभार मानले.

06 प्रभात पुणे, रविवार, दि. २२ जानेवारी २०१७

# ग्रामीण विद्यार्थी कृषी संस्कृतीचे अपत्य

## कांतिलाल उमाप : राजगुरू महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ

राजगुरूनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - ग्रामीण भागातील विद्यार्थी कृषी संस्कृतीचे अपत्य असतो. त्याने शिक्षण घेताना उपजीविकेचे साधन म्हणून नोकरी व्यवसायाचा विचार करतानाच कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन, अशा अनेक शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देऊन शेतीतून पुढे जाताना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप यांनी केले. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवी प्रदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते.

प्रसंगी विधिमंडळातील निवृत्त सचिव बी. एस. भोर, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए व बीबीए शाखांमधील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली.

कांतिलाल उमाप म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांत उपजत शहाणपण असते. या शहाणपणाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी कठोर मेहनतीला सकारात्मक दृष्टिकोनाची जोड दिली तर ते नक्कीच त्यांच्या आयुष्यात यशस्वी होऊ शकतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या प्रगतीबद्दल आणि संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत असलेल्या सुविधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून संस्थेने या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे पालकत्व घेताना त्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याभिमुख शिक्षण देऊन त्यांचे जीवन घडविण्याचा प्रयत्न करावा.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी व परिश्रम या त्रिसूत्रीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे कार्यक्षेत्र कोणतेही निवडले तरी त्याची उंची गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे, असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांच्या फीडबॅक ॲपचे ऑनलाईन उद्घाटन कांतिलाल उमाप यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. परीक्षा विभाग प्रमुख प्रा. व्ही. डी. कुलकर्णी यांनी आभार मानले.



राजगुरूनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवी प्रदान समारंभात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करताना आयुक्त कांतीलाल उमाप, देवेंद्र बुट्टे पाटील आदी मान्यवर.

लोकमत पुणे, रविवार, दि. २२ जानेवारी २०१७ ४

# शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य द्या : उमाप

दावडी : ग्रामीण भागातील विद्यार्थी हा कृषी संस्कृतीचे अपत्य असतो. त्याने शिक्षण घेताना उपजीविकेचे साधन म्हणून नोकरी-व्यवसायाचा विचार करतानाच कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन असा अनेक शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देऊन शेतीतून पुढे जाताना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची गरज आहे, असे मत राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवीग्रहण समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते.

याप्रसंगी विधिमंडळातील निवृत्त सचिव बी. एस. भोर, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड.मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवीग्रहण समारंभात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करताना महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप व संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील व इतर.

या कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए व बीबीए शाखांमधील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी पदवीग्रहण केले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी व परिश्रम या त्रिसूत्रीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे कार्यक्षेत्र कोणतेही निवडले, तरी त्याची उंची गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे, असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार परीक्षा विभाग प्रमुख प्रा. व्ही. डी. कुलकर्णी यांनी मानले. (वार्ताहर)

पुण्यनगरी 4 ▮ सोमवार, २३ जानेवारी २०१७ । पुणे

# तरुणांनी शेतीपूरक व्यवसाय करावेत

## कांतिलाल उमाप : राजगुरू महाविद्यालयात पदवीग्रहण समारंभ

▮ राजगुरूनगर : प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थी कृषी संस्कृतीचे अपत्य असतो. त्याने उपजीविकेचे साधन म्हणून नोकरी-व्यवसायाचा विचार करतानाच कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन असा अनेक शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देत स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप यांनी केले.



राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पदवीग्रहण समारंभात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करताना राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप व इतर मान्यवर.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवीग्रहण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी विधी मंडळातील निवृत्त सचिव बी. एस. भोर, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए व बीसीएस शाखांमधील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी पदवीग्रहण केले.

उमाप पुढे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपजत शहाणपण असते. या शहाणपणाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी कठोर मेहनतीला सकारात्मक दृष्टिकोनाची जोड दिली तर ते नक्कीच त्यांच्या आयुष्यात यशस्वी होऊ शकतील. शिक्षण संस्थेने महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालकत्व घेताना त्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याभिमुख शिक्षण देऊन त्यांचे जीवन यशस्वितेचा प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी व परिश्रम या त्रिसूत्रीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे कार्यक्षेत्र कोणतेही निवडले तरी त्याची उंची गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे, असे सांगितले.

तत्पूर्वी, उमाप यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या फीडबॅक ॲपचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रा. व्ही. डी. कुलकर्णी यांनी आभार मानले.

केसरी पुणे, २३ जानेवारी २०१७ ३

# विद्यार्थ्यांनी शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य द्यावे : कांतिलाल उमाप

राजगुरुनगर, (वार्ताहर) : ग्रामीण भागातील विद्यार्थी हा कृषी संस्कृतीचे अपत्य असतो. त्याने शिक्षण घेताना उपजीविकेचे साधन म्हणून नोकरी व्यवसायाचा विचार करतानाच कुकुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन असा अनेक शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देऊन शेतीतून पुढे जाताना, स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतीलाल उमाप यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते.



पदवीग्रहण समारंभात बोलताना राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर)

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. यावेळी विधीमंडळातील निवृत्त सचिव बी. एस. भोर, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए व बीसीएस शाखांमधील सुमारे विद्यार्थ्यांनी पदवीग्रहण केले.

उमाप पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपजत शहाणपण असते. या शहाणपणाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी कठोर मेहनतीला सकारात्मक दृष्टिकोनाची जोड दिली तर ते नक्कीच त्यांच्या आयुष्यात यशस्वी होऊ शकतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

संध्या | सोमवार, दि. २३ जानेवारी २०१७ | ६

# विद्यार्थ्यांनी शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देण्याची गरज : कांतिलाल उमाप

राजगुरुनगर : (किरण खुडे) : ग्रामीण भागातील विद्यार्थी हा कृषी संस्कृतीचे अपत्य असतो. त्याने शिक्षण घेताना उपजीविकेचे साधन म्हणून नोकरी व्यवसायाचा विचार करतानाच कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन अशा अनेक शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देऊन शेतीतून पुढे जाताना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी विधीमंडळातील निवृत्त सचिव बी. एस. भोर, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए व बीसीएस शाखांमधील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी पदवीग्रहण केले. या प्रसंगी बोलताना कांतिलाल उमाप पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपजत शहाणपण असते. या शहाणपणाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी कठोर मेहनतीला सकारात्मक दृष्टिकोनाची जोड दिली, तर ते नक्कीच त्यांच्या आयुष्यात यशस्वी होऊ शकतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या प्रगतीबद्दल आणि संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत असलेल्या सुविधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून संस्थेने या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे पालकत्व घेताना त्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याभिमुख शिक्षण देऊन त्यांचे जीवन घडविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख